शिक्षा अंतिम करणेबाबत.
(श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ ९८३ /२०२६
अहिल्यानगर, दिनांक-स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ:- १.गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/२१७/२०२५, दिनांक ११/०२/२०२५.
२.या कार्यालयाचे ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२१८/२०२५ दिनांक २९/०९/२०२५.
३.गटविकास अधिकारी पंचायत समिती,श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/११९/२०२५ दिनांक ०९/१०/२०२५ नुसार श्री.यादव पोपट शहाजी,विस्तार अधिकारी (पं) यांचा खुलासा दिनांक ०६/१०/२०२५.
४.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२१६७९३/२६, दि.०९.०३.२०२६.
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती,श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/२६४/२०२६ दिनांक २४/०४/२०२६ नुसार श्री.यादव पोपट शहाजी,विस्तार अधिकारी (पं) यांचा खुलासा दिनांक २३/०३/२०२६.(प्राप्त दिनांक ०८/०५/२०२६)
६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (१)

संदर्भ क्रमांक ०२ अन्वये, श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम ६ नुसार कारवाई करण्याच्या दृष्टीने ज्ञापन व दोषारोप १ ते ४ बजावण्यात आले होते. संदर्भ क्र.३ नुसार श्री यादव यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या मार्फत संदर्भ क्र.२ च्या अनुषंगाने खुलासा या कार्यालयात खुलासा सादर करण्यात आला होता. खुलाश्याचे अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा यांनी कार्यालयीन कामकाज विलंबाने कार्यवाही केल्याचे स्पष्ट झाले होते. या अनियमिततेमुळे ग्रामपंचायत स्तरावर नागरिक सुविधापासुन वंचित राहीले. तसेच विकास कामे ठप्प झाली म्हणुन श्री यादव यांना संदर्भ क्र.४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) अन्वये पुढील एक वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही, अशा स्वरुपात एक वर्षासाठी रोखुन धरणे ही शिक्षा का करण्यात येऊ नये ?, याबाबत नोटीस देण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक ०५ अन्वये श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. त्यांच्या खुलाश्यांचे अवलोकन करता व प्राप्त खुलाश्याच्या अनुषंगाने श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा यांनी विलंबाने कार्यवाही केल्याचे स्पष्ट होत असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( १ ) अन्वये ------- ठपका ठेवणे ---------------------------------------------------------------------- , ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०६०६००९३........ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-07-2026 18:45:01

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.यादव पोपट शहाजी, विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती श्रीगोंदा
द्वारा व प्रतः- गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,श्रीगोंदा.

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.